| Publication – Shivner | Page No. 2 |
|---|---|
| Edition – Print | Date – 10/10/2021 |



# करो संभवच्या प्रांशू सिंघल यांना १२वा सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर (एसईओवाय) पुरस्कार- इंडिया २०२१,

## भारत सरकारच्या प्रमुख वैज्ञानिक सल्लागार प्रा. के. विजय राघवन यांच्या हस्ते प्रदान

नोएडा, दि. ८ : वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची सहयोगी संस्था असलेल्या श्वाब फाऊंडेशन फॉर सोशल आंत्रप्रेनरशिप आणि ज्युबिलंट ग्रुपच्या ज्युबिलंट भारतीय फाऊंडेशनने आज करो संभवच्या प्रांशू सिंघल यांना प्रतिष्ठेचा सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर पुरस्कार-२०२१ इंडिया देऊन गौरवित केले. हा पुरस्कार जगातील विविध क्षेत्रांमधील ख्यातनाम व्यक्तिमत्वांच्या उपस्थितीत एका व्हर्चुअल समारंभात भारत सरकारच्या प्रमुख वैज्ञानिक सल्लागार प्रा. के. विजय राघवन यांच्या हस्तेप्रदान करण्यात आला.

या वर्षाच्या एसईओवाय एवॉर्ड इंडिया २०२१च्या विजेत्यांचा सत्कार आणि अंतिम फेरीतील उमेदवारांचे अभिनंदन करताना भारत सरकारच्या प्रमुख वैज्ञानिक सल्लागार प्रा. के. विजय राघवन म्हणाले की, ही जागतिक साथ एक



मोठे संकट ठरली आहे आणि समाजाच्या प्रत्येक विभागातील सामाजिक उद्योजक सर्वाधिक धोक्याच्या घटकातील लोकांसाठी आपत्कालीन सुटका करणारे म्हणून पुढे आले आहेत. त्यांनी आपल्या स्त्रोतांचा जास्तीत जास्त वापर केला आहे. आपल्याला तळागाळात काम करणाऱ्या या बदलकर्त्या लोकांकडून महत्त्वाचा धडा घेणे गरजेचे आहे कारण ते जवळपास अशक्य आव्हाने शक्य करून दाखवतात. त्यांच्या कल्पना, कार्य आणि आव्हाने सोडवण्यातील त्यांचे योगदान यांचा गौरव केल्याने त्यांना त्यांचे काम आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी उत्साह निर्माण होईल. मी श्वाब फाऊंडेशन आणि ज्युबिलंट इंडिया फाऊंडेशनचे आता मागील जवळपास एका दशकापेक्षा अधिक कालावधीपासून या सामाजिक उद्योगांचा गौरव करण्याच्या उपक्रमासाठी कौतुक करतो.

एसईओवाय इंडिया एवॉर्ड २०२१ चे विजेते करो संभवचे प्रांशू सिंघल हे चक्रीय अर्थव्यवस्था शक्य करण्यासाठी कार्यरत आहेत आणि ते उद्योगांना त्यांच्या प्रत्यक्ष अडचणी सोडवण्यात मदत करत आहेत. करो संभवमध्ये इ-कचरा, प्लास्टिक पॅकेजिंग कचरा, बॅटरी करचा आणि काच या गोष्टींवर काम केले जाते आणि मॅट्रेस आणि वस्त्रोद्योग यांच्यासारख्या कमी लक्ष केंद्रित केलेल्या क्षेत्रांबाबतही ते पुढाकार घेत आहेत. प्रांशू यांचे उद्दिष्ट उत्तमरित्या प्रशासित आणि उत्तरदायी असलेल्या एंड ऑफ लाइफ कचरा व्यवस्थापन उद्योगाला पारदर्शक कार्यपद्धतींद्वारे आकार देऊन वाढवण्याचे आहे.

अफोर्डेबल हाउसिंग'
क्सेलन्स' पुरस्कार

